# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **01/12/2022**

**Brief of the work done :-**

महिलेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस 2 वर्षे कारावास.

---

# विनयभंगप्रकरणी दोन वर्षांचा कारावास

## मालेगाव तालुक्यातील घटना

**मालेगाव, दि. १ (प्रतिनिधी)**

तालुक्यातील मुंगळा गावात तीन वर्षापूर्वी घडलेल्या विनयभंग प्रकरणाचा निवाडा २९ नोव्हेंबर रोजी करण्यात आला आहे. याप्रकरणी मालेगाव प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी मुंगळा येथील जगदीश तुकाराम बोबडे याला दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

प्राप्त माहितीनुसार, जिल्ह्यात गुन्हेगारी वृत्तीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी अधिनस्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या. त्यानुसार मालेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत ७ डिसेंबर २०१९ रोजी मुंगळा येथील आरोपी जगदीश बोबडे याने सकाळी फिर्यादीचा विनयभंग करण्यात आला होता. यावेळी पीडितेने आरडाओरड केल्याने आरोपीने तेथून पळ काढला. याप्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. यामध्ये मालेगाव पोलिसांनी सखोल तपास करुन प्रकरण न्याय प्रविष्ठ केले होते. दरम्यान, याप्रकरणी मालेगाव प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्ट क्रमांक २ चे न्यायमुर्ती प्रविण कुलकर्णी यांनी सुनावणी घेवून न्यायनिवाडा केला. त्यानुसार आरोपी जगदीश बोबडे यास दोन वर्षे कारावास व एक हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास एक महिना कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांचे मार्गदर्शनात मसपोनि पुष्पलता वाघ यांनी केला. सरकार पक्षा तर्फे सरकारी वकील भास्कर इंगळे यांनी पाहिले असून पैरवी अमंलदार म्हणुन नवलसिंग चरावंडे यांनी कामकाज पाहीले आहे.